# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट ३५९ - २३** **दिनांक : - १७/१०/२०२३**

## एटीएम सेंटर मधुन पैसे काढुन देण्यासाठी मदतीचा बहाणा करुन हातचलाखीने एटीएम कार्डची अदला बदली करुन फसवणुक करणाऱ्या आरोपीतास पकडण्यात काशिमीरा पोलीस ठाणेच्या गुन्हे प्रकटीकरण पथकास यश.

-------oooo---------

दिनांक ०९/१०/२०२३ रोजी सायंकाळी ०५.३० वा च्या सुमारास फिर्यादी नामे राजेश झिंगुर गुप्ता, वय ४८ वर्षे, धंदा नोकरी, रा. रुम नं ६, गगरी मिती नगर, काशिमिरा, ता.जि.ठाणे, रा. झिंगुर, गोठवा नगरा, बलिया, नारा, उत्तरप्रदेश, हे कोटक महींद्रा बँकेच्या एटीएम मध्ये पैसे काढण्यासाठी गेले असता एटीएम बाहेर असलेला अनोळखी इसमाने फिर्यादी यांना एटीएम मधुन पैसे काढुन देतो असे सांगुन त्यांचेकडील कोटक महींद्रा बॅकेचे एटीएम कार्ड घेवुन हातचालाखीने अदला बदली करुन फिर्यादी यांचे अकाउंट मधुन ४००००/- रुपये काढुन त्यांची फसवणुक केल्याबाबत काशिमीरा पोलीस ठाणे गु.र.नं ६९०/२०२३ भा.द.वि.सं. कलम ४२० प्रमाणे दि १२/१०/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाबाबत मा.वरीष्ठांनी गंभीर दखल घेवुन आरोपीत यास अटक करणेकामी सुचना देण्यात आल्या होत्या. त्या अनुषंगाने मा.वरीष्ठांच्या आदेशाने ३ वेगवेगळी पथके तयार करुन गुन्हयाचे घटनास्थळाचे तसेच आजुबाजूचे साधारणतः १४० ते १५० पेक्षा जास्त सी.सी.टी.व्ही कॅमेरे चेक करुन तसेच गुप्त बातमीदार यांचे मार्फतीने आरोपी नामे कृष्णा शिवनारायण तिवारी, वय २४ वर्ष, व्यवसाय-ड्रायव्हर, रा. रुम नं ६, राम जानकी चाळ, हवाई पाडा रोड, दत्त मंदिर जवळ, सातीवली रोड, गौराई पाडा, सातीवली, ता.वसई, जि.पालघर यास १० तासाच्या आत ताब्यात घेवुन अधिक चौकशी केली असता त्याचा सदर गुन्हातील सहभाग निष्पन्न झाला आहे. आरोपीकडून फिर्यादी यांचे कोटक महींद्रा बँकेचे तसेच विविध बँकांचे असे एकुण ३५ एटीएम कार्ड तसेच फिर्यादी यांची फसवणुक झालेली ४०,०००/- रु रोख रक्कम हस्तगत करण्यात आले असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पो.उप.निरी. स्वप्नील बेलोसे हे करीत आहेत.

सदर कामगीरी मा. पोलीस उपआयुक्त परिमंडळ ०१ चे श्री जयंत बजबळे सो, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. महेश तरडे, मिरारोड विभाग, मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि.श्री संदीप कदम, पो.नि.समीर शेख (गुन्हे), स.पो.नि.योगेश काळे, पो.उप.निरी. शिवाजी खाडे, स.फौ. रमेश इगवे, अनिल पवार, पो.हवा.निलेश शिंदे, प्रताप पाचुंदे, राहुल सोनकांबळे, स्वप्नील मोहीले, पो.अं. रविंद्र कांबळे, राजेंद्र सुर्यवंशी, प्रविण टोबरे, किरण विरकर सर्व नेमणुक काशिमीरा पोलीस ठाणे व पो.हवा. जयप्रकाश जाधव (पो.उ.आ. कार्यालय,परीमंडळ १) यांनी उत्कृषरित्या पार पाडली आहे.

**----0000----**